आली दिवाळी

मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.in » पुणे, पिंपरी-चिंचवड » मंगळवार, दिनांक १४ नोव्हेंबर २०२३। पान १

# राजकीय डाव करणारे नेते एकाच मंचावर!

## दिवाळी फराळाच्या कार्यक्रमासाठी आमदार, खासदार यांनी उपस्थिती

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।** शहरामध्ये गेल्या अनेक वर्षांपासून एक स्नेह मेळावा आणि दिवाळी फराळाचा कार्यक्रम आयोजित केला जातो. या कार्यक्रमामध्ये पिंपरी- चिंचवडमधील स्थानिक विरोधक आणि सत्ताधारी नेत्यांना एकत्र बघण्याची संधी मिळते. एकमेकांचे हेवेदावे, कुरघोडीचे राजकारण बाजूला ठेवून राजकीय नेत्यांसह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी एकत्रितपणे दिवाळी फराळाचा मनमुराद आनंद घेतला. दिशा सोशल फाउंडेशनच्या वतीने यंदा आठव्या वर्षी दिवाळी फराळाचे आयोजन करण्यात आले.




यावेळी कलाक्षेत्रातील सिनेअभिनेते प्रवीण तरडे यांच्यासह देवदत्त नागे यांची उपस्थिती होती. पिंपरी-चिंचवड शहर हे औद्योगिक नगरी म्हणून ओळखले जाते. शहरातील राजकारण हे देखील तितकंच महत्वाचं मानलं जातं. गेल्या काही वर्षांपासून सत्ताकारण बदललं असून शहरांमध्ये भाजपाची सत्ता होती. विरोधक म्हणून राष्ट्रवादीने आपली चोख भूमिका बजावली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बंड केल्यानंतर राष्ट्रवादीत दोन गट पडले आहेत. शहरामध्ये अजित पवार गट, शरद पवार गट, शिवसेना, शिवसेना उद्धव ठाकरे गट, काँग्रेस असं राजकारण बघायला मिळतं. या गटांमध्ये एकमेकांविरोधात कुरघोड्या आणि राजकारण करण्याचं काम नेहमीच सुरू असतं. परंतु, हे सर्व विसरून दिशा सोशल फाउंडेशनने आयोजित केलेल्या दिवाळी फराळाच्या कार्यक्रमासाठी सर्व स्थानिक नेत्यांसह आमदार, खासदार यांनी उपस्थिती लावली होती. या कार्यक्रमासाठी विशेष वेळ काढून अनेक नेत्यांनी हजेरी लावत जवळपास तीन तास सर्व विरोधक आणि सत्ताधारी गप्पा-गोष्टीत रंगले होते. राजकीय विरहित म्हणून दिशा सोशल फाउंडेशनच्या या कार्यक्रमाकडे बघितलं जातं. हे त्यांचं आठव वर्ष होतं. या कार्यक्रमांमध्ये खासदार श्रीरंग बारणे, माजी खासदार अमर साबळे, माजी मंत्री बाळा भेगडे, आमदार अण्णा बनसोडे, माजी आमदार दीपक पायगुडे, अभिनेते प्रवीण तरडे, देवदत्त नागे यासह राष्ट्रवादी अजित पवार गटाचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे, भाजपचे शहराध्यक्ष शंकर जगताप, काँग्रेसचे शहराध्यक्ष कैलास कदम, मनसेचे शहर अध्यक्ष सचिन चिखले, संजोग वाघेरे, राहुल कलाटे, सचिन साठे, विठ्ठल उर्फ नाना काटे, शत्रुघ्न काटे, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील गव्हाणे यांसह अनेक स्थानिक नेत्यांनी सहभाग घेतला. यावेळी प्रवीण तरडे म्हणाले, सार्वजनिक जीवनाच्या विविध क्षेत्रातील मान्यवरांना एकाच व्यासपीठावर आणून सांस्कृतिक विचारांची दिवाळी साजरी करण्याचा हा अनोखा उपक्रम दिशा सोशल फाउंडेशन राबवत आहे मी या संस्थेचा एक भाग आहे याचा मला अभिमान वाटतो. तर देवदत्त नागे म्हणाले, दिवाळीचा सण हा प्रकाशाचा उत्सव आहे स्नेह आपुलकी आणि एकात्मता जपणारा दिवस आहे दिवाळी फराळाच्या निमित्ताने आपल्यातील स्नेह आणि आपुलकी अधिक वाढावी म्हणून अशा प्रकारचे कार्यक्रम प्रत्येक शहरात राबविले पाहिजे असे मत त्यांनी व्यक्त केले.

# महापालिकेच्या शाळेत क्रीडाशिक्षकांची वानवा!

## महापालिकेच्या १०५ शाळांमध्ये फक्त आठच क्रीडा शिक्षक

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।** महापालिकेच्या सर्व शाळा स्मार्ट करण्याकडे महापालिका प्रशासनाचा कल आहे. त्यासाठी डिजिटल शिक्षण देण्यात येत आहे. अभ्यासाव्यतिरिक्त काही विद्यार्थी क्रीडा निपुणदेखील आहेत. मात्र, एकीकडे शाळा डिजीटल होत असताना प्रशासनाचे क्रीडा विभागाकडे दुर्लक्ष होत आहे. महापालिकेच्या १०५ शाळांमध्ये फक्त आठच क्रीडा शिक्षक आहेत. तसेच, विद्यार्थ्यांना शाळांमध्ये पुरेसे क्रीडा साहित्य देखील उपलब्ध नाही. विद्यार्थ्यांचा शारीरिक आणि बौद्धीक विकास हा शाळेतच (झळाऑिळ) घडत असतो. शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या सुदृढ राहण्यासाठी मैदानी खेळ खेळणे आवश्यक असते. मात्र, महापालिकेच्या २२ शाळांना मैदान नाही. १७ शाळांची मैदाने छोटी असल्याने विद्यार्थ्यांनी खेळायचे कसे असा प्रश्न पडत आहे. शाळेच्या वेळापत्रकात आठवड्यातील दोन ते चार तास खेळाचे असतात. यामध्येच विद्यार्थ्यांच्या क्रीडागुणांचा विकास होत असतो. विद्यार्थी कोणत्या खेळात निपुण आहे. हे विद्यार्थ्यांच्या प्राथमिक शिक्षणातील अवस्थेतच कळण्यासा मदत होते. पण याच खेळण्या-बागडण्याच्या वयात क्रीडा शिक्षक आणि क्रीडा साहित्य नसल्याने विद्यार्थ्यांची खेळाविषयीची गरज आणि आवड कमी होत आहे. प्रत्येक शाळेच्या मैदानात विशिष्ट ठिकाणी खो-खो चे खांब आणि डबलबार असतात. विद्यार्थी शाळेच्या सुट्टीमध्येदेखील याठिकाणी खेळतात. मात्र, महापालिकेच्या शाळांमध्ये खो-खो चे खांब आणि डबलबार दिसत नाहीत. तसेच, क्रीडा साहित्यदेखील नसल्याने मुले सुट्टीत लपंडाव, पाठशिवणी खेळताना दिसतात. शाळांनी मैदानावर ॲथलेटिक्स, खो-खो, कबड्डी, क्रिकेट, हॉकी, फुटबॉल, व्हॉलीबॉल या खेळासाठी सुविधा उपलब्ध करुन द्यायची मागणी होत आहे. विद्यार्थ्यांना प्राथमिक शिक्षण घेत असतानाच चांगली क्रीडा मैदानेअसतील तर त्यांचा सरावही उत्तम होईल. महापालिकेने देखील राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू तयार करण्यासाठी शाळांना मैदाने उपलब्ध करुन देण्याची गरज आहे. महापालिका विद्यार्थ्यांची खेळासाठी कुचंबणा होत आहे. महापालिका शाळेत असलेल्या क्रीडाशिक्षकांना इतर कामे लावली जातात. तसेच,क्रीडाशिक्षक कमी असताना निवृत्तीनंतर रिक्त क्रीडाशिक्षकाचे पद भरले जात नाही. मुळात कला आणि क्रिडा हे सर्वांगीण विकासासाठी आवश्यक आहे. शिक्षकांची पद भरली जात नसल्याने क्रीडा विकासाला खीळ बसली आहे.

# दिल्लीखालोखाल पिंपरी-चिंचवडची हवा वाईट!

## मुंबईसह राज्यातील अनेक शहरांमध्ये प्रदूषण चिंताजनक

**पिंपरी ।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**
नरक चतुर्दशी आणि लक्ष्मीपूजनाला रविवारी पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरात मोठ्या प्रमाणात फटाक्यांची आतषबाजी झाल्यामुळे या शहरांमधील हवेची गुणवत्ता 'अतिवाईट' श्रेणीत गेली. देशात राजधानी दिल्लीनंतर पिंपरी-चिंचवड हे दुसऱ्या क्रमांकाचे प्रदूषित शहर ठरले आहे. राज्याच्या राजधानी व उपराजधानीतही न्यायालयाचे आदेश डावलून आतषबाजी झाल्यामुळे हवेची पातळी कमालीची खालावल्याचे स्पष्ट झाले आहे. मोठ्या प्रमाणात सुरू असलेली बांधकामे, वाहनांचा धूर यामध्ये फटाक्यांच्या धुराची भर पडल्यामुळे दिवाळीमध्ये प्रदूषण नेहमीच वाढते. हे लक्षात घेऊन उच्च न्यायालय तसेच सर्वोच्च न्यायालयाने फटाके फोडण्यावर वेळेचे बंधन घातले होते. मात्र ही मर्यादा कुठेही पाळली गेली नसल्याचे स्पष्ट झाले आहे. मुंबई, नागपूर, पुणे ही महानगरेही त्याला अपवाद नाहीत. प्रदूषण रोखण्यासाठी पिंपरी-चिंचवड आणि पुणे महापालिकांनी मार्गदर्शक सूचना जारी केल्या होत्या. मात्र रविवारी नरक चतुर्दशी असल्याने पहाटेपासूनच फटाके फोडण्यास सुरुवात झाली. शहरात ठिकठिकाणी दिवसभर आतषबाजी सुरूच होती. सायंकाळी लक्ष्मीपूजनानंतर सुरू झालेले मोठ्या आवाजाचे फटाके रात्री उशिरापर्यंत फुटत होते. हवेची गुणवत्ता मोजणाऱ्या 'सफर' प्रणालीनुसार सोमवारी प्रदूषणकारी धूलिकणांचे प्रमाण शिवाजीनगरमध्ये ३८२, कोथरूडमध्ये ३५८, कात्रजमध्ये ३५५, हडपसरमध्ये ३३२, पाषाणमध्ये ३१५, लोहगावमध्ये ३८२, पिंपरी चिंचवडमधील भूमकर चौकात ३१३, भोसरीमध्ये ३४२, निगडी ३४१, आळंदी ३१२ नोंदविले गेले. मुंबईतील हवेचा दर्जा सलग दुसऱ्या दिवशी खालावलेला होता. सोमवारी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नोंदीनुसार मुंबईच्या हवेची गुणवत्ता अतिवाईट स्वरूपाची होती. मालाड येथे सोमवारी अतिवाईट हवेची नोंद झाली. तिथे हवा गुणवत्ता निर्देशांक ३०७ नोंदवला गेला. कुलाबा येथे २०७, बोरिवली येथे २२३, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स येथे २२३ होता. मागील तीन दिवस पावसाच्या शिडकाव्यामुळे सुधारलेली हवा फटाक्यांनी पुन्हा खराब केली. रविवारी पावसाचा शिडकावा झाल्यामुळे गेल्या आठ वर्षांतील दिवाळीच्या काळातील सर्वात स्वच्छ हवा राजधानीमध्ये अनुभवायला मिळाली होती. मात्र त्यानंतर रविवारी संध्याकाळपासून रात्री उशिरापर्यंत सुरू असलेल्या आतषबाजीमुळे सोमवारी सकाळी पुन्हा एकदा दिल्लीतील हवेची पातळी खालावली. परिणामी स्वित्झलडस्थित 'आयक्यू एअर' या प्रदूषणाच्या नोंदी ठेवणाऱ्या कंपनीच्या आकडेवारीनुसार दिल्ली हे जगातील सर्वाधिक प्रदूषित शहर ठरले आहे.

'उपराजधानी नागपुरातही रात्री ८ ते १० या कालमर्यादेचे उल्लंघन करून फटाके फोडले गेले.

'रविवारी पहाटेपासूनच शहरात मोठ्या आवाजाचे व धूर पसरविणारे फटाके वाजविले जात होते.

'सायंकाळी हे प्रमाण वाढले व मध्यरात्रीपर्यंत हा प्रकार सुरू होता.

'परिणामी शहराच्या चारही स्थानकांवरील हवा गुणवत्ता निर्देशांक २०० ते २४० म्हणजेच 'वाईट' या वर्गवारीत नोंदविला गेला.

'तब्बल सात तास हा निर्दे शांक याच श्रेणीवर कायम होता.



### मुंबईची हवा 'अतिवाईट'

**» मुंबईतील हवेचा दर्जा सलग दुसऱ्या दिवशी खालावलेला होता. सोमवारी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नोंदीनुसार मुंबईच्या हवेची गुणवत्ता अतिवाईट स्वरूपाची होती. मालाड येथे सोमवारी अतिवाईट हवेची नोंद झाली. तिथे हवा गुणवत्ता निर्देशांक ३०७ नोंदवला गेला. कुलाबा येथे २०७, बोरिवली येथे २२३, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स येथे २२३ होता. मागील तीन दिवस पावसाच्या शिडकाव्यामुळे सुधारलेली हवा फटाक्यांनी पुन्हा खराब केली.**

# भर रस्त्यात सराफावर गोळीबार करून लुटणाऱ्या सहा आरोपींना पोलिसांनी केली दिल्लीतून अटक!

## तिन्ही आरोपींना आठ दिवसांची पोलिस कोठडी

**पिंपरी-चिंचवड ।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**
काही दिवसांपूर्वी पुण्यातील बीटी कवडे रोडवर सराफावर गोळीबार करून फरार झालेल्या दिल्लीतील सहा आरोपीना पुणे शहर पोलिसांनी अटक केली आहे. तिन्ही आरोपींना आज कोर्टात हजर केले असता त्यांना आठ दिवसांची पोलिस कोठडीही सुनावण्यात आली आहे. आरोपी हल्ला करून दिल्ली येथे पळून गेले होते. परंतु, पुणे पोलिसांनी मोठ्या शिताफीने त्यांना अटक केली आहे. वानवडी पोलिस स्टेशनच्या पथकाने देशाच्या राजधानीतून तीन आरोपींना अटक केली. ज्यात शूटर बिलाल अहमद असदली त्यागी (वय ३४), हनी वाल्मिकी (वय २६) आणि सागर राज कुमार (वय २३, सर्व दिल्लीचे रहिवासी) यांचा समावेश आहे. यापैकी त्यागीने सराफावर हल्ला गोळी झाडली होती.

सविस्तर माहिती अशी, की मदनलाल ओसवाल (वय ७१, रा. बीटी कवाडे रोड) आणि त्यांचा मुलगा प्रतीक ओसवाल (वय ३५) यांचे हडपसर येथे सोन्याच्या दागिन्यांचे दुकान आहे. दिनांक ८ नोव्हेंबर रोजी रात्री दुकान बंद करून ते घरी परतत असताना बी.टी.कवडे रोडवरील जयसिंग ससाणे गार्डन जवळ त्यांच्यावर हल्ला करण्यात आला. त्यांच्याकडे असलेल्या बॅगेत रोख रक्कम दहा हजार आणि दोन तोळ्याचे दागिने हिसकवण्याच्या प्रयत्न दरोडेखोरांनी केला असता प्रतिक याने त्यांना विरोध केला. यावेळी आरोपी त्यागी याने प्रतिकच्या दोन्ही पायावर आणि गालावर गावठी पिस्टलने गोळ्या झाडल्या. यामध्ये प्रतीक गंभीर जखमी झाला. त्यांच्यावर इनामदार हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत, याप्रकरणी प्रतीकचे वडील मदनलाल ओसवाल यांनी एफआयआर दाखल केला. या घटनेची माहिती मिळताच वानवडी पोलिस ठाण्याचे पथक घटनास्थळी दाखल झाले आणि प्रतीकला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. पोलिसांनी तीन अज्ञात व्यक्तींवर कलम ३४ ३४१ (चुकीच्या प्रतिबंधासाठी शिक्षा) आणि ३९७ (मृत्यू किंवा गंभीर दुखापत करण्याचा प्रयत्न करून दरोडा किंवा डकैती) आणि शस्त्रास्त्र कायद्याच्या संबंधित कलमांखाली गुन्हा दाखल केला आहे. तपासादरम्यान, पोलिसांनी गुन्ह्याच्या ठिकाणी बसवलेल्या अनेक सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज आणि हल्लेखोरांनी पळून जाण्यासाठी वापरलेला मार्ग तपासला. तपासानुसार हल्लेखोरांनी पुण्यात एक खोली भाड्याने घेतली होती. तपासाच्या आधारे, वानवडी पोलिसांच्या पथकाने दिल्लीतील आरके पुरम परिसरातून तीन आरोपींना अटक केली.



# सदानंदाचा येळकोट येळकोट!

## पाचवी-आठवीतील ३२ हजार ६६७ विद्यार्थ्यांना प्रोत्साहन




**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** जेजुरीच्या खंडोबा देवाच्या सोमवती यात्रेसाठी सुमारे दोन लाख भाविकांनी गर्दी केली होती. सोमवारी सकाळी सात वाजता मुख्य इनामदार पेशवे, खोमणे,माळवदकर यांनी सूचना करताच खांदेकऱ्यांनी पालखी उचलून खांद्यावर घेतली. देव कऱ्हा नदीवर स्नानासाठी निघाले. पालखीची मंदिर प्रदक्षणा झाल्यावर त्यामध्ये पुजाऱ्यांनी खंडोबा म्हाळसादेवीच्या उत्सव मूर्ती आणून ठेवल्या. सदानंदाचा येळकोट असा जयघोष करीत भाविकांनी पिवळ्या धमक भंडाऱ्याची मुक्त उधळण केली.देवा तुझी सोन्याची जेजुरी या उक्तीप्रमाणे खंडोबा गड सोन्यासारखा उजळून निघाला.सनई चौघड्याच्या निनादात देवांचा पालखी सोहळा सुरू झाला. यावेळी बंदुकीच्या फैरी झाडून सलामी देण्यात आली. खंडोबा देवस्थानचे मुख्य विश्वस्त पोपटराव खोमणे व इतर विश्वस्त यावेळी उपस्थित होते.पालखी गड उतरून खाली आली. ऐतिहासिक छत्री मंदिरमार्गे कऱ्हा नदीवर पोहोचली. पालखीच्या अग्रभागी मानाचा अश्व होता.धार्मिक वातावरणात पालखीतील खंडोबा माळसादेवीच्या मूर्तींना पवित्र कऱ्हा नदीतील पाण्याने स्नान घालण्यात आले.हा सोहळा अनुभवण्यासाठी हजारो भाविक उपस्थित होते. अडीच वाजता पालखी गावातील ग्रामदैवत जानुबाई मंदिरात आणून ठेवण्यात आली. यावेळी दर्शनासाठी मोठी गर्दी उसळली.रात्री सात वाजता पालखी पुन्हा खंडोबा गडावर आणण्यात आली. रोज मोरा (ज्वारी) वाटून पालखी सोहळ्याची सांगता करण्यात आली.

मागील सोमवती यात्रेत गडावरून पालखी खाली उतरताना चेंगराचेंगरी होऊन आठ जण जखमी झाले होते,त्यामुळे खंडोबा देवस्थान व पोलीस प्रशासन यांनी पालखी सोहळा व्यवस्थित पार पडण्यासाठी विशेष काळजी घेतली होती. पालखी अवजड असल्याने तिला खांदा देणारे खांदेकरी हे नेहमीचे व माहितगार असतात, अनेक भाविक मध्ये घुसून पालखीला खांदा देण्याचा प्रयत्न करतात, त्यामुळे पालखी घसरून अपघात होतात म्हणून यावेळी चौदाशे खांदेकर्यांना रंगीत शर्ट देण्यात आले होते. आवश्यक तेथे पोलिसांनी अडथळे उभारून भाविकांची गर्दी रोखली होती.

# वडिलांना कोर्टात एकटं जाऊ देणार नाही!

## निवडणूक आयोग आणि सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू








**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात बंडखोरी झाली आणि फूट पडून शरद पवार गट आणि अजित पवार गटात पक्षावरील मालकीवरून वाद निर्माण झाला. यावर आता केंद्रीय निवडणूक आयोग आणि सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू आहे. या पार्श्वभूमीवर शरद पवार गटातील खासदार सुप्रिया सुळे यांनी हे खटले आणि त्याच्या सुनावणीवर प्रतिक्रिया दिली. यात त्यांनी ८० वर्षांच्या वडिलांना कोर्टात एकटं जाऊ देणार नाही, असं मत व्यक्त केलं. त्या सोमवारी (१३ नोव्हेंबर) एका सभेत बोलत होत्या.

सुप्रिया सुळे म्हणाल्या, सगळ्या जबाबदाऱ्या असतात. माणूस सगळं तर करू शकत नाही. मुलं, नवरा, कुटुंब यांच्यासाठी ऑक्टोबरपर्यंत वेळच नाही. मतदारसंघ बघायचा, की पक्षाची कामं बघायची की कोर्टातील खटले बघायचे. शरद पवार स्वतः या कामांसाठी जातात. मात्र, जनाची नाही, पण मनाची तर आहे. ८० वर्षांच्या वडिलांना मी कोर्टात एकटं जाऊन देणार नाही. मतदारसंघातील अर्धा वेळ खटले लढण्यात जात आहे. पहिल्यांदा सर्वोच्च न्यायालयात गेले आहे. हारेंगे या जितेंगे, बाद में देखेंगे, मगर लढेंगे जरूर. आपल्याकडे म्हणतात कोर्टाची पायरी चढू नये. मात्र, आम्ही चढलो. आता एकदा कोर्टाची पायरी चढल्यावर उतरायचं नाही, असं मत सुप्रिया सुळे यांनी व्यक्त केलं. दरम्यान, शरद पवार ओबीसी असल्याचा दावा केला जात आहे. मात्र, शरद पवार गटाकडून या दाव्याचं खंडन करण्यात आलं आहे. शरद पवारांच्या कन्या व खासदार सुप्रिया सुळे यांनी हा दावाच मुळात हास्यास्पद असल्याची प्रतिक्रिया दिली. सुप्रिया सुळे म्हणाल्या, तुम्ही त्या कंपनीचं नाव बघितलंय का? हा बालिशपणा चाललाय, असं सुप्रिया सुळे म्हणाल्या. हा सगळा प्रकार हास्यास्पद आहे. शरद पवार दहावीला होते, त्यावेळेस इंग्रजीमधून प्रमाणपत्र दिले जात नव्हते. पवार दहावीला होते तेव्हा त्यांचा दाखला इंग्रजीत असू शकतो का? आजकाल खोटी प्रमाणपत्रे बाजारामध्ये सर्रास मिळतात.

### पवार ओबीसी असल्याचा दावा


» माणूस सगळं तर करू शकत नाही. मुलं, नवरा, कुटुंब यांच्यासाठी ऑक्टोबरपर्यंत वेळच नाही. मतदारसंघ बघायचा, की पक्षाची कामं बघायची की कोर्टातील खटले बघायचे. शरद पवार स्वतः या कामांसाठी जातात. मात्र, जनाची नाही, पण मनाची तर आहे. ८० वर्षांच्या वडिलांना मी कोर्टात एकटं जाऊन देणार नाही. मतदारसंघातील अर्धा वेळ खटले लढण्यात जात आहे. पहिल्यांदा सर्वोच्च न्यायालयात गेले आहे. हारेंगे या जितेंगे, बाद में देखेंगे, मगर लढेंगे जरूर. आपल्याकडे म्हणतात कोर्टाची पायरी चढू नये. मात्र, आम्ही चढलो. आता एकदा कोर्टाची पायरी चढल्यावर उतरायचं नाही, असं मत सुप्रिया सुळे यांनी व्यक्त केलं. दरम्यान, शरद पवार ओबीसी असल्याचा दावा केला जात आहे.

# गरिबांची दिवाळी गोड कधी होणार?

## आनंदाचा शिधा अपूर्णच; नागरिकांची तक्रार

**पुणे ।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

दिवाळीत आनंदाचा शिधा म्हणून शंभर रुपयांत सहा वस्तू देण्याचा उपक्रमास सुरुवात झाली. मात्र, दिवाळी असूनही पुणे शहरातील सिंहगड रोड, धायरी, कोथरुड तसेच अन्य भागांमध्ये सहा वस्तूंचे किट्स अद्याप पोहोचले नाहीत. त्यामुळे लाभार्थ्यांसह रेशन विक्रेत्यांकडून नाराजी व्यक्त होत आहे. सहापैकी काही ठिकाणी तीन वस्तू तर काही ठिकाणी वस्तू त्या गोदामात येऊनही लाभार्थ्यांना मिळाल्या नसल्याचे समोर आले आहे. राज्यातील सर्व गरिबांची दिवाळी गोड करण्यासाठी आनंदाचा शिधा दिला जात आहे. शंभर रुपयांमध्ये साखर, एक किलो, पामतेल एक लिटर आणि रवा, चणाडाळ, मैदा आणि पोहे प्रत्येकी अर्धा किलो अशा सहा वस्तू आहेत.




> “शहरातील लाभार्थ्यांना दिवाळीचा आनंदाचा शिधा अद्याप पूर्णत: पोहोचला नाही. काही भागांमध्ये काही ठिकाणी दोन, तीन किंवा चार वस्तू पोहोचल्या आहेत. जोपर्यंत सहा वस्तू पूर्ण मिळत नाही तोपर्यंत ई पॉस मशीनकडून स्वीकारल्याचे दाखविले जात नाही. त्यामुळे तांत्रिक अडचण येत आहे.
>
> **-गणेश डांगी,**
> **अध्यक्ष स्वस्त धान्य दुकानदार संघटना**

शहरात सातशेहून अधिक स्वस्त धान्य दुकाने आहेत. शहराच्या विविध भागात ऐन दिवाळीत आनंदाच्या शिधाच्या रुपाने सहा वस्तू अद्याप मिळाल्या नाहीत, अशा नागरिकांच्या तक्रारी येत आहेत. काही भागांमध्ये चार वस्तू मिळाल्या तर काही भागात तीन वस्तू मिळाल्याचे रेशन दुकानदार सांगत आहेत. तर अन्न धान्य वितरण विभागाकडून सर्व वस्तू रेशन विक्रेत्यांपर्यंत पोहोचविण्ग़ात आल्या असल्या तरी एकाच ठिकाणी सर्व वस्तू मिळाल्या नसल्याचे विक्रेते सांगत आहे. त्याबाबत तक्रारी करीत आहेत. काही भागात गोदामांमध्ये संपूर्ण सहा वस्तू पोहोचल्या आहेत. मात्र, दिवाळी सुरू असूनही अनेकांना आनंदाचा शिधा रेशन दुकानात उपलब्ध झाला नाही. त्यामुळे ग्राहका नाराजी व्यक्त करीत आहेत. शहरातील सुमारे सव्वातीन लाख कार्डधारकांना तर जिल्ह्यातील सुमारे पावणेसहा लाख कार्डधारकांना आनंदाचा शिधा वितरीत करण्यात येणार आहे. पुणे शहरात सिंहगड रोड, धायरी, कोथरुड, खिलारवाडी या भागात आनंदाचा शिधा पोहोचला नाही. तसेच अन्य भागात माल पोहोचला नाही. अन्न पुरवठा विभागाकडून व्यवस्थित नियोजन केले नसल्याने ऐन दिवाळीत लाभार्थ्यांना शिधा वेळेत संपूर्ण किट्समध्ये उपलब्ध होऊ शकला नाही. काही ठिकाणी रवा, तेल बाकी तर काही ठिकाणी मैदा वस्तू अद्याप बाकी आहे, असे विक्रेते सांगत आहेत.

दरम्यान, पुणे जिल्हा पुरवठा अधिकारी डॉ. सीमा होळकर म्हणाल्या, ‘जिल्ह्यातील पावणेसहा लाख लाभार्थ्यांपैकी सुमारे ८० टक्के लाभार्थ्यांपर्यंत ग्रामीण भागात आनंदाचा शिधा पोहोचला आहे. संपूर्ण सहा वस्तू लाभार्थ्यांना देण्यात आल्या आहेत. येत्या दोन दिवसांत २० टक्के लाभार्थ्यांपर्यंत शिधा पोहोचेल.’

या संदर्भात शहर अन्नधान्य वितरण अधिकारी दादासाहेब गिते यांच्याशी संपर्क साधला असता मात्र तो होऊ शकला नाही.

# सुप्रिया सुळे बारामतीतील धनगर आंदोलकाच्या भेटीला

## आरक्षणाच्या प्रश्नावरुन सरकारवर जोरदार हल्ला

**पुणे ।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

धनगर समाजाला एसटी प्रवर्गाचे आरक्षण मिळावे या मागणीसाठी गेल्या पाच दिवसांपासून बारामतीत उपोषणाला बसलेल्या चंद्रकांत वाघमोडे यांची खासदार सुप्रिया सुळे यांनी भेट घेतली. आरक्षणाच्या प्रश्नावर राज्य व केंद्र सरकार असंवेदनशील असल्याची टीका त्यांनी यावेळी केली. या भेटीनंतर पत्रकारांशी बोलताना सुळे यांनी केंद्र व राज्य सरकारवर जोरदार तोफ डागली. मराठा, धनगर, मुस्लिम व लिंगायत आरक्षणासाठी राष्ट्रवादी कायम या समाजासोबत असून येत्या अधिवेशनात संसदेत हा मुद्दा उपस्थित करणार असल्याचे त्या म्हणाल्या. आरक्षणाच्या प्रश्नावर सरकार असंवेदनशील आहे. अंतरवाली सराटीत आंदोलकांना अमानुष मारहाण झाली. जरांगे पाटील यांच्याबाबत काय केले हे राज्याने पाहिले असेही सुळे म्हणाल्या. सुळे पुढे म्हणाल्या, चौंडीतील उपोषणावेळी सरकारने ५० दिवसांचा कालावधी मागून घेतला होता. आता तीन दिवस त्यासाठी उरले आहेत. या तीन दिवसांचा कालावधी बारामतीतील आंदोलकांनी सरकारला




द्यावा. तोपर्यंत उपोषण स्थगित करावे असे मी त्यांना सांगितले. परंतु, राज्य सरकार असंवेदनशील असल्याने आंदोलकांशी कोणी अद्याप चर्चा केली नाही. मी भेटीनंतर मुख्यमंत्री कार्यालयाशी संपर्क साधला आहे. मुख्यमंत्र्यांच्या कानावर मी ही बाब घालणार आहे. राज्यात आरक्षण देणार असे म्हणणारा भाजप हा दिल्लीत आरक्षणाला विरोध करतो. भाजप म्हणजे भ्रष्ट जुमला पार्टी असून त्यांनी आरक्षण देणार की नाही हे स्पष्ट करण्याची गरज आहे. आरक्षणाचा प्रश्न एक दिवसीय अधिवेशन घेवून ते संपवू शकतात. भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांनी बारामतीत येवून पहिल्या कॅबिनेटमध्ये आरक्षण देतो असा शब्द धनगर समाजाला दिला होता. परंतु त्याला दशक लोटले तरी हा प्रशअन सुटला नाही. दिल्लीमध्ये मी या विषयी केंद्रीय मंत्री अर्जून मुंडा यांची भेट घेत मार्ग काढण्याचा प्रयत्न करणार आहे. दिवाळी पाडव्याला उपमुख्यमंत्री अजित पवार उपस्थित राहणार का, या प्रश्नावर खासदार सुळे म्हणाल्या, त्यांची प्रकृती कशी आहे, हे आपणाला माहित आहे. त्यांना गर्दीच्या ठिकाणी जाण्यास परवानगी नाही. ते मास्क वापरत आहेत. त्यामुळे डॉक्टर सांगतील त्यानुसार ते यायचे की नाही हे ठरवतील. उपमुख्यमंत्री अजित पवार दिल्लीत केंद्रीय मंत्री अमित शहा यांना भेटले. त्यांच्या भेटीत काय झाले हे मला माहित नाही. मला मतदारसंघातील प्रश्न महत्त्वाचे आहेत. त्यात आता निवडणूक आयोग आणि सर्वोच्च न्यायालयात लढाई सुरु आहे. त्या कामात मी आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील ट्रिपल इंजिन खोके सरकार काय करते, याची मला माहिती नाही असे सुळे म्हणाल्या.